(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायानिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

[२०१८] ११ एस. सी. आर. ३७४

महाराष्ट्र सरकार व इतर.

विरुद्ध

तसनीम रिजवान सिद्धिकी

(फौजदारी अपील क्र .११२४/२०१८)

५ सप्टेंबर २०१८

[सरन्यायाधीश दिपक मिश्रा, न्या. ए.एम. खानविलकर आणि

न्या. डॉ. डी.वाय. चंद्रचूड]

रिट– हॅबियस कॉर्पस (बंदी प्रत्यक्षीकरण लेख) – उत्तरवादीच्या पतीला पोलिसांनी तपासाधीन गुन्ह्यात अटक केली – त्यानंतर, मॅजिस्ट्रेटने त्याला पोलिस कोठडीत पाठवले – एक व्यक्ती जी तपासाधीन गुन्ह्याच्या संदर्भात *अधिकारक्षेत्रीय मॅजिस्ट्रेटने पारित केलेल्या रिमांड आदेशानुसार पोलिसांच्या ताब्यात आहे, त्या व्यक्तीच्या बाबतीत हॅबियस कॉर्पसची याचिका चालविता येऊ शकली असती का? – उच्च न्यायालयाने उत्तरवादीचा पतीला पोलिसांनी अवैधरित्या आणि बेकायदेशीरपणे ताब्यात असल्याचे*

मानले आणि पोलिस अधिकाऱ्यांवर तीव्र टिपण्णी केली – अपीलामध्ये असा निर्णय दिल की : सध्याच्या प्रकरणात, हे मान्य आहे की, उच्च न्यायालयात हॅबिअस कॉर्पसच्या लेखी आदेशासाठी याचिका दाखल करताना, उत्तरवादीचा पती सदर कालावधीत, प्राथमिक माहीती अहवाल संबंधी, मॅजिस्ट्रेटने पोलिस कोठडी मंजूर करणारा आदेश पारित केल्याच्या अनुषंगाने पोलिसांच्या ताब्यात होता – पुढे, याचिका मॅजिस्ट्रेटच्या आदेशाला आव्हान न देता दाखल केली गेली – हे एक सातत्यपूर्ण अवैध स्थानबद्धतेचे प्रकरण नव्हते, तर फौजदारी प्रकरणाच्या तपासा दररम्यान अंमलात असणाऱ्या पोलिस रिमांड, जो अधिकारक्षेत्रीय मॅजिस्ट्रेटद्वारा निर्गमित आदेशाने मंजूर केला गेला, त्यानुसार विद्यमान व्यक्ति न्यायालयीन कोठडीत होता – हॅबिअस कॉर्पसचा कोणताही आदेश दिला जाऊ शकला नाही – त्यामुळे, उच्च न्यायालयाने मॅजिस्ट्रेटने दिलेल्या न्यायालयीन आदेशाला आव्हान दिले नसताना अटकेच्या गुणवतेत प्रवेश करून, चुक केली – पुढे, प्रतिज्ञापत्रावर उत्तर देण्याची संधी न देता उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यां विरुद्ध तीव्र टिपण्णी केली, – त्यानुसार , उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करण्यात आला – भारतीय दंड संहिता, १८६० – कलम ४२०, २०१, १७१, ४६७, ४६८ आणि १२०-बी – फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ – कलम १६० आणि ४१-ए – माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० – कलम ६६, ७२ आणि ७२(ए) – भारतीय टेलिग्राफ अधिनियम, १८८५ – कलम २६.

अपील मंजूर करून, न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला :

निर्णय: १. सध्याच्या प्रकरणात, हे मान्य आहे की, जेव्हा उत्तरवादीने हॅबिअस कॉर्पस जारी करण्यासाठी याचिका दाखल केली आणि नंतर उच्च न्यायालयाने त्यात निर्णय दिला, तेव्हा तिचा पती पोलीस कोठडी मध्ये होता, कारण मजिस्ट्रेटने त्याला एफआयआर संदर्भात पोलीस कोठडी देण्याचा आदेशानुसार पोलिस कोठडीत होता. पुढे, मजिस्ट्रेटच्या नमूद केलेल्या आदेशाला आव्हान न देता हेबिअस कॉर्पसच्या दिलास्यासाठी मर्यादित याचिका दाखल केली गेली. प्रकरणाच्या त्या दृष्टीने, ते सातत्यपूर्ण अवैध स्थानबद्धतेचे प्रकरण नव्हते, तर फौजदारी प्रकरणाच्या तपासा दररम्यान अंमलात असणाऱ्या पोलिस रिमांड, जे क्षेत्राधिकार असलेल्या मजिस्ट्रेटद्वारा निर्गमित आदेशाने मंजूर केला गेला, त्यानुसार विद्यमान व्यक्ति न्यायालयीन कोठडीत होता . परिणामी, हॅबियस कॉर्पसचा कोणताही आदेश जारी केला जाऊ शकत नाही. [परिच्छेद ९][३८१-एच; ३८२-ए-सी]

२. आक्षेपित आदेश उच्च न्यायालयाने न्यायालयीन रिमांड आदेश अद्याप अंमलात असतानाही जारी केला. उच्च न्यायालयाने उत्तरवादीचा पती न्यायालयाने निर्देश दिल्यास मुक्त केला जाऊ शकतो, या पोलीस उपआयुक्तांच्या वतीने केलेल्या विधानावर नाराज होऊ नये, पोलीस उपआयुक्तांना असे निवेदन करण्याशिवाय काहीही पर्याय नव्हता. कारण, तो अंमलात असलेल्या न्यायालयीन आदेशानुसार पोलिसांच्या ताब्यात

असलेल्या आरोपीला, स्वेच्छेने मुक्त करू शकत नव्हता. उच्च न्यायालयाने तपासी अधिकाऱ्या विरोधात कठोर टिप्पणी करण्याऐवजी त्याला शपथपत्रावर स्पष्टीकरण देण्याची संधी दिली पाहिजे होती. [परिच्छेद १०] [३८२-एफ-जी]

३. सध्याच्या प्रकरणातील तथ्यात्मक परिस्थितीत हॅबियस कॉर्पसचा कोणताही आदेश दिला जाऊ शकत नाही, त्यामुळे उच्च न्यायालयाने २३ मार्च २०१८ पर्यंत पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यासाठी मजिस्ट्रेटने दिलेल्या न्यायालयीन आदेशाला कोणतेही आव्हान नसताना अटकेच्या गुणवत्तेवर प्रवेश करणे टाळले पाहिजे होते आणि विशेषतः मजिस्ट्रेटच्या आदेशातील कारणांसाठी. अशा काहीशा समान परिस्थितीत, या न्यायालयाने *राज्य द्वारे पोलिस निरीक्षक आणि इतर विरुद्ध एन.एम.टी.जॉय इमॅक्युलेट* प्रकरणात तपासी अधिकाऱ्या विरुद्ध त्यांनी केलेल्या तपासाबद्दल उच्च न्यायालयाने केलेल्या निंदात्मक व तीव्र टिप्पण्यांना नापसंती दर्शविली आहे. त्यामुळे, सध्याच्या प्रकरणाच्या तथ्यांनुसार संबंधित पोलीस अधिकाऱ्यां विरुद्ध परिच्छेद ४ ते ६ मध्ये केलेल्या टिप्पण्या काढून टाकण्यात आल्या आहेत. [परिच्छेद ११] [३८२-एच; ३८३-ए-सी]

सौरभ कुमार वडिलांमार्फत विरुद्ध तुरुंगांधीकारी, कोनेला कारागृह आणि इतर

(२०१४) १३ एससीसी ४३६ : [२०१४] ८ एससीआर ९०९; *मनुभाई रतिलाल*

पटेल विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर **(२०१३) १ एससीसी ३१४ : [२०१२] ८ एससीआर ९९३;**

राज्या मार्फत पोलीस निरीक्षक व इतर विरुद्ध एन.एम.टी. जॉय इमॅक्युलेट **(२००४) ५ एससीसी ७२९ : [२००४] २ पुरवणी एससीआर ७१ – यावर अवलंबून.**

उल्लेखलेले निर्णय विधी

[२०१४] ८ एससीआर ९०९	**वर अवलंबून**	**परिच्छेद ९**
[२०१२] ८ एससीआर ९९३	**वर अवलंबून**	**परिच्छेद ९**
[२००४] २ पुरवणी एससीआर ७१	**वर अवलंबून**	**परिच्छेद ११**

फौजदारी अपीलीय अधिकारिता : फौजदारी अपील क्र. ११२४/२०१८.

मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. १३५३/२०१८ मध्ये दिनांक २१.०३.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशातून उद्भवलेले.

निशांत रामकांतराव काटनेश्वरकर, अपीलकर्त्यांचे वकील.

सी. ए. सुंदरम, वरिष्ठ वकील, निखिल सिंगवी, कनक बोस, अभिषेक गुप्ता, उत्तरवादीचे वकील.

न्यायालयाचा निर्णय **न्या. ए. एम. खानविलकर** यांच्याद्वारे देण्यात आला-

१. अनुमति दिली.

२. अपीलकर्त्यांनी रिट याचिका क्रमांक १३५३/२०१८ मध्ये २१ मार्च २०१८ रोजीच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर आक्षेप घेतला आहे, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने उत्तरवादीने तिच्या पतीला, जो उत्तरवादीच्या मते पोलिसांकडून एफआयआर क्र. आय-३१/२०१८ च्या संदर्भात अवैधपणे बेकायदेशीरपणे ताब्यात घेतला आहे, सादर करावा असा आपिलकर्त्यांना निर्देश देणारा हॅबिअस कॉर्पस आदेश देण्यासाठी दाखल केलेली रिट याचिका मंजूर केली आहे.

३. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर मुख्यत्वे दोन कारणांवर आक्षेप घेतला आहे. पहिले, की एका व्यक्तीला, जी सक्षम न्यायालयाने दिलेल्या रिमांडच्या आदेशानुसार तपासाधीन फौजदारी प्रकरणाच्या संदर्भात पोलिसांच्या ताब्यात घेतलेली आहे, हॅबियस कॉर्पसचा आदेश दिला जाऊ शकत नाही. दुसरे, उच्च न्यायालयाने संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर टिप्पण्या करण्यास टाळावे आणि त्या टिप्पण्या काढून टाकाव्यात.

४. थोडक्यात सांगायचे तर, या अपीलाच्या दाखल होण्यास कारणीभूत असलेल्या घटनांचा सारांश असा आहे की, २४ जानेवारी २०१८ रोजी स्थानिक पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की मुकेश पांडियन, जो एक खासगी गुप्तचर आहे, विविध व्यक्तींचे कॉल डिटेल रेकॉर्ड मिळवत आहे आणि ती मोठ्या रकमेत विकत आहे. पोलिसांनी मुकेश पांडियनला अटक केली आणि व्होडाफोन कंपनीच्या कॉल डिटेल्सची मागणी

केली. मुकेश पांडियन विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ४२० आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ६६, ७२ आणि ७२(ए) अंतर्गत शिक्षपात्र गुन्ह्यासाठी एफआयआर क्रमांक आय-३१/१८ नोंदवला गेला. तपासादरम्यान भारतीय टेलिग्राफ अधिनियम, १८८५ च्या कलम २६ आणि आयपीसी च्या कलम २०१, १७१, ४६७, ४६८ आणि १२०-बी अंतर्गत अतिरिक्त गुन्हे जोडले गेले. नंतर पोलिसांनी प्रशांत पालेकर याला अटक केली आणि त्याच्या मोबाइलमध्ये रिझवान आलम सिद्धीकी (यातील उत्तरवादीचा पती) आणि इतर व्यक्तींशी संबंधित विविध मोबाइल चाट सापडल्या. तपासादरम्यान पोलिसांनी रिझवान आलम सिद्धीकी आणि प्रशांत पालेकर यांच्यातील गोळा केलेल्या चॅट रेकॉर्ड मध्ये, रिझवान आलम सिद्धीकीने प्रशांत पालकरकडे नवाजुद्दीन सिद्धीकीच्या पत्नीच्या कॉल डिटेल्ससाठी विचारले होते, जे रिझवान आलम सिद्धीकीच्या गुन्ह्यातील सहभागाचे दर्शक होते. यामुळे, १४ फेब्रुवारी २०१८ रोजी रिझवान आलम सिद्धीकीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६० अंतर्गत नोटिस जारी करण्यात आली, ज्याला उत्तर देताना त्याने पोलिसांना कळविले की तो २१ फेब्रुवारी २०१८ पर्यंत प्रवास करत आहे आणि २२ फेब्रुवारी २०१८ नंतर पोलिसांसमोर हजर होईल. त्यानुसार, रिझवान आलम सिद्धीकी आपला जबाब नोंदवण्यासाठी २३ फेब्रुवारी २०१८ रोजी पोलिस स्टेशन मध्ये आले. तपास जस जसा पुढे गेला, तस तपासी अधिकाऱ्याने रिझवान आलम सिद्धीकीच्या उपस्थितीला

आवश्यक मानले आणि १५ मार्च २०१८ रोजी त्याला मोबाइलवर संदेश पाठवून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. रिझवान आलम सिद्धीकीने त्या संदेशांना उत्तर दिले आणि तपासात सहभागी होण्याची इच्छा दर्शविली. तथापि, तपासी अधिकाऱ्यांच्या मते, रिझवान आलम सिद्धीकीने पोलिसांसोबत सहकार्य केले नाही म्हणून, अतिरिक्त सावधानी म्हणून, १६ मार्च २०१८ रोजी पोलिसांनी सीआर.पी.सी. च्या कलम ४१-ए अंतर्गत नोटिस जारी केली, जी रिझवान आलम सिद्धीकीवर बजावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याने ती स्वीकारण्यास नकार दिला. तसेच, जेव्हा तपासी अधिकारी आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांसह रिझवान आलम सिद्धीकीच्या ठिकाणी नोटिस बजावणी करण्यासाठी गेले, तेव्हा असे आढळले की रिझवान आलम सिद्धीकी त्याच्या मोबाइल फोन आणि लॅपटॉप मधील पुरावे नष्ट करत आहे. त्यामुळे, तपासी अधिकाऱ्याने त्याला अटक करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आणि जवळच्या पोलिस स्थानकाची म्हणजे वर्सोवा पोलिस स्थानक मदत घेतली. त्याच्या अटकेनंतर, त्यांना १७ मार्च २०१८ रोजी त्याला कायदेशीर कालावधीत क्षेत्रीय अधिकार असलेल्या मॅजिस्ट्रेटसमोर उपस्थित करण्यात आले. क्षेत्रीय अधिकार असलेल्या मॅजिस्ट्रेटने रिझवान आलम सिद्धीकीला त्यांचे समाधान झालेवर २३ मार्च २०१८ पर्यंत पोलिसांच्या ताब्यात पाठवण्यास मान्यता दिली.

५. परंतु उत्तरवादीने उच्च न्यायालयाकडे धाव घेतली आणि १८/१९ मार्च २०१८ रोजी रिट याचिका दाखल केली, जी रिट याचिका क्रमांक १३५३/२०१८ आहे, ज्यामध्ये तिने अपीलदारांना (याचिकेत उत्तरवादी) तिच्या पतीला न्यायालयासमोर उपस्थितीत करण्यास आणि कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार त्याची अटक उचित ठरविण्याची प्रार्थना केली. पुढील दिलासा म्हणून तिने रिझवान आलम सिद्धीकीला मुक्त करण्याची मागणी केली. रिट याचिका २० मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आली, जेव्हा न्यायालयाने आपल्या आदेशात पुढील प्रमाणे नोंद केली:

> "४. श्री. मर्चंट असे सादर करतात की एकदा ही नोटिस जारी झाली की, तर उप-कलम (१) च्या अनुषंगाने, पोलिस अधिकाऱ्याला याची खात्री झाली की याचिकर्त्याच्या पतीची अटक आवश्यक नाही आणि हे प्रकरण कलम ४१ च्या उप-कलम (१) अंतर्गत येतो. त्यामुळे, त्यांनी याचिकाकर्त्याच्या पतीला नोटिसमध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांच्यासमोर हजर राहण्याचे निर्देश देणारी नोटिस जारी करण्याचा निर्णय घेतला.
>
> "५. वास्तविक वाद असा आहे की ही नोटिस १६ मार्च २०१८ रोजीची आहे आणि यामध्ये याचिकर्त्याच्या पतीला १७ मार्च २०१८ रोजी नोटिसवर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांसमोर हजर

राहण्याची माहिती दिली आहे. श्री. मर्चंट असे सादर करतात की, कलम ४१-ए च्या उप-कलम २ मध्ये अशा नोटिसीच्या जारी करण्याचा उल्लेख आहे, परंतु अशा वाक्याचा अर्थ 'नोटिसची बजावणी किंवा अंमलबजावणी' असा घेतला पाहिजे, अन्यथा उप-कलम १ निरर्थक ठरतो. त्यामुळे, जोपर्यंत व्यक्ती नोटिसच्या अटींचे पालन करत नाही किंवा स्वतःची ओळख करून देण्यास असमर्थ आहे, तोपर्यंत पोलिस अधिकारी, या संदर्भात सक्षम न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार, त्याला नोटिसमध्ये उल्लेख केलेल्या गुन्ह्यासाठी अटक करू शकत नाहीत. जर याचिकाकर्तीच्या पतीने नोटिसच पालन केला असत, तर श्री. मर्चंट यांच्या मते, अशा याचिकेचे सादरीकरणाचे कोणतेही प्रश्न उद्भवत नाहीत, परंतु उत्तरवादीचे असे ठाम मत आहे की, जेव्हा त्यांनी याचिकाकर्तीच्या पतीला ही नोटिस बजावणी करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याने ती स्वीकारण्यास नकार दिला. त्याप्रमाणे पंचनामा तयार करण्यात आला.

६. श्री. मर्चंट यांच्या म्हणण्यानुसार आणि याचिकेत दिलेल्या लेखी कथनांच्या आधारावर, पंचनामा तयार करण्यात आला आहे

आणि त्याची प्रत कागदपत्र पुस्तकाच्या पृष्ठ ४१ आणि ४२ वर आहे, आम्ही त्याची काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. तो मराठीत आहे.

७. संपूर्ण पंचनाम्याचे श्री. याग्निक, एपीपी यांच्या सहाय्याने अवलोकन केले गेले, जे त्यांच्या सर्व समजूत पटेल अशा क्षमतांसह, यामध्ये असे एकही वाक्य सापडवू शकले नाहीत की याचिकाकर्तीच्या पतीने ही नोटिस त्याच्या कार्यस्थळावर/त्याच्या कार्यालयात बजावणी केल्यानंतर स्वीकारण्यास नकार दिला. या परिस्थितीत, विशेषतः पृष्ठ ४२ वर पंचांच्या आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या स्वाक्षऱ्यांच्या खाली आरोपीची स्वाक्षरी असल्याने, ती स्वाक्षरी नोटिस मिळाल्याची पोच आहे की आता श्री. याग्निक यांनी न्यायालय समक्ष कथन केल्याप्रमाणे नकारा बद्दल आहे, याबद्दल प्रश्न आहे. एकदा असे विधान पंचनाम्यातून अनुपस्थित असल्यास, तर आम्हाला प्रथम दर्शनी श्री. याग्निक यांच्याशी सहमत होणे खूप कठीण वाटते.

८. तथापि, श्री. याग्निक समकालीन नोंद सादर करण्यासाठी वेळ मागतात, जे त्यांच्या मते दर्शवेल की नोटिसी/याचिकेदाराचा

पतीने सीआर.पी.सी. च्या कलम ४१-ए च्या उप-कलम (१) अंतर्गत असलेल्या नोटिसाला स्वीकारण्यास नकार दिला. मूळ अभिलेख किंवा समकालीन अभिलेख कुठे आहे याबद्दल विचारल्यास, श्री. याग्निक यांचे उत्तर आहे की आज चालू असलेल्या विधानसभेच्या सत्रात एक प्रश्न आहे, ज्याचे उत्तर संबंधित मंत्र्याला द्यावे लागेल आणि त्यांना मूळ दस्तऐवज आणि अधिकारी यांनी विधानसभेच्या सचिवालयात उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण अभिलेख विधानसभेच्या सचिवालयात नेण्यात आली आहे. श्री. याग्निक, म्हणून, उद्यापर्यंत, म्हणजे २१ मार्च २०१८ रोजी ११:०० वाजता वेळ मागतात. फक्त श्री. याग्निक यांना असे अभिलेख सादर करण्यासाठी आणि न्यायालयाच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्षम करण्यासाठी आम्ही या प्रकरणाला उद्या, २१ मार्च २०१८ रोजी ११:०० वाजता पोस्ट करतो, अन्यथा, कायद्यातील सर्व परिणाम सुरू होतील._

९. श्री. याग्निक यांना ही संधी फक्त त्यामुळे दिली जाते की पृष्ठ ४१ आणि ४२ वरील दस्तऐवज दर्शवितो की याचिकेदाराचा पती

त्याच्या कार्यालयात उपस्थित होता, आणि त्याने व त्याच्या कर्मचाऱ्यांनी वस्तू आणि त्याच्या ई-मेल आयडेंटिटी, मोबाइल आणि संबंधित माहितीचा तपशील दिला. पंचनाम्यात नोंदवले आहे की त्याची तयारी १६ मार्च २०१८ रोजी २०.१० वाजता सुरू झाली आणि २२.१० वाजता समाप्त झाली.

१०. २१ मार्च २०१८ रोजी ११.०० वाजता पुढे ठेवण्यात आले."

६) पुन्हा, २१ मार्च २०१८ रोजी हे प्रकरण सूचीबद्ध करण्यात आले, जेव्हा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सरकारी अभियोकत्याने सादर केलेल्या अभिलेखासह पोलिस डायरीतील नोंद, रिमांड रिपोर्ट आणि इतर दस्तऐवजांचे अवलोकन केले. त्यांनी असे मानले की, संबंधित अभिलेख रिझवान आलम सिद्धीकीच्या अटकेपूर्वी कायद्याच्या आदेशाचे आवश्यक पालन दर्शवत नाही. हा निष्कर्ष नोंदवल्यानंतर, त्यांनी असे निरीक्षण केले की अशा अटक संविधानाच्या कलम २१ अंतर्गत हमी दिलेल्या मौल्यवान अधिकाराचे उल्लंघन करत आणि म्हणून, उत्तरवादीच्या विनंतीवर रिझवान आलम सिद्धीकीला ताबडतोब मुक्त करण्यास मान्यता दिली. त्याच वेळी, उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध अत्यंत तीव्र टिप्पण्या केल्या, ज्या आक्षेपित निर्णयाच्या परिच्छेद ४-६ मध्ये नोंदवलेल्या आहेत, जे पुढीलप्रमाणे वाचावे :

“४. आजच्या संक्षिप्त सुनावणीमध्ये श्रीमती. पै नी सूचना घेण्यासाठी वेळ मागितला आणि उपआयुक्त पोलिसांशी बोलल्यानंतर. त्यांच्या विनंतीवर, प्रकरणात १.०० वाजता सुनावणी घेतली गेली आणि जेव्हा प्रकरण पुकारले गेले, तेव्हा पोलिस उपआयुक्त यांच्या सूचनेनुसार, जे न्यायालयात उपस्थित होते, असे सांगितले की सदर उपआयुक्त यांना, जर या न्यायालयाने तसे निर्देश दिले तर, याचिकाकर्त्याला मुक्त करण्यात काही अडचण नाही.

५. एकदा का आम्ही आमच्या आधीच्या आदेशानुसार आणि आजच्या सुनावणीमध्ये नोंद घेतली की तो न्यायालयास कोणतेही निवेदन करून सहकार्य करत नाही, तर त्याला मान्य करावे लागेल की त्याने कायदा आपल्या हातात घेतला आहे आणि तो स्वेच्छेने याचिकर्त्याच्या पतीला ताब्यातून मुक्त करण्यास पुढे जाईल. हे या पोलिस अधिकाऱ्याकडून अपेक्षित होते आणि जर त्याने प्रामाणिकपणे आणि खऱ्या मनाने माफी मागितली असती आणि याचिकर्त्याच्या पतीला मुक्त करण्यासाठी वेळ मागितला असता, तर आम्ही त्याच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्याचे निर्देश दिले

नसते. तथापि, ते ठाम आहेत आणि त्यांनी आग्रह धरला की जर फक्त या न्यायालयाने सांगितल्यास याचिकर्त्याच्या पतीला मुक्त केले पाहिजे, तर त्याला मुक्त करण्यास काहीही अडचण नाही. तो आता न्यायालयात दंडाधिकाऱ्या समोरची कार्यवाही आणि रिमांड रिपोर्टची मजकूर न्यायालयासमोर आणणार आहे, जे त्यानुसार त्याला याचिकर्त्याच्या पतीला २३ मार्च २०१८ पर्यंत ताब्यात ठेवण्याची परवानगी देत.

६. आम्हाला वाटत नाही की डायरीतील नोंदी किंवा रिमांड प्रक्रियेतून काही सहाय्य मिळू शकेल. आम्हाला असे वाटत नाही की मॅजिस्ट्रेटनेयाचिकर्त्याच्या पतीला २३ मार्च २०१८ पर्यंत पोलिसांच्या ताब्यात ठेवण्याचा दिलेला आदेश या न्यायालयाला बंधन घालू शकतो आणि जर संबंधित न्यायिक अधिकाऱ्याच्या निर्दशनास खरी आणि बरोबर माहिती आणून दिली गेली असती, तर कदाचित, त्यांनी या पोलिस अधिकाऱ्याच्या विनंतीवर तो आदेश पारित केला नसता. म्हणून, आम्ही याचिकर्त्याच्या पतीला बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवण्यात आले असल्याचे मानून, निर्देश देत आहोत की त्याला पोलिसांच्या ताब्यातून ताबडतोब मुक्त

केले जावे, तसेच आम्ही उच्च पोलिस अधिकाऱ्यांना, विशेषतः भारत सरकारच्या गृह विभागातील कार्यकारी अधिकाऱ्यांना, या पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध कायद्याला आपल्या हातात घेतल्याबद्दल शिस्तभंग प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देत आहोत आणि याचिकाकर्ती आणि तिचा पती या पोलिस अधिकाऱ्या विरुद्ध, कायदा हातात घेतल्याबद्दल, दिवाणी दावा आणि फौजदारी अभियोग दाखल किंवा सुरू करू शकतात. अशा अभियोगाला याचिककर्तीच्या पतीविरुद्ध कायद्यातील उल्लंघनाबद्दल सुरू होणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेचा सतत प्रभाव नसेल."

७. या निर्णयाने व्यथित झालेल्या असलेल्या अपीलकर्त्यांनी वरील परिच्छेद ३ मध्ये आधीच दर्शविलेल्या दोन मुद्द्यांवर सद्याचे अपील दाखल केले आहे. दुसरीकडे, उत्तरवादीनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे समर्थन केले आहे आणि अपीलात कोणतीही गुणवत्ता नसल्याचे म्हणटले आहे. तसेच, रिझवान आलम सिद्धीकीला आक्षेपित निर्णयानंतर आधीच मुक्त केले गेल्याची माहिती आम्हाला देण्यात आली आहे. या सादर निवेदनावर, अपीलकर्त्यांचे वकील असे नमूद करतात की, अपीलकर्ते उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यांवर केलेल्या तीव्र टिप्पण्यांबद्दल अधिक चिंतित आहेत

आणि जर पोलिसांना रिझवान आलम सिद्धीकी विरुद्ध कायदयानुसार कारवाई करण्यासाठी स्वतंत्रता दिली, तर ते यामध्ये अधिक समाधानीत असतील.

८. आम्ही अपीलकर्त्यांचे वकिल श्री. निशांत रमाकांतराव काटनेश्वरकर आणि उत्तरवादीसाठी उपस्थित होणारे वरिष्ठ वकील श्री. सी. ए. सुंदरम यांचे म्हणणे ऐकले.

९. एक व्यक्ती जी तपासाधीन गुन्ह्याच्या संदर्भात क्षेत्रीय अधिकार असलेल्या मॅजिस्ट्रेटने पारित केलेल्या रिमांड आदेशानुसार पोलिसांच्या ताब्यात आहे, त्या व्यक्तीच्या बाबतीत हॅबियस कॉर्पसची याचिका चालविता येणे योग्य होऊ शकला असत का? हा प्रश्न आहे, हा मुद्दा ***सौरभ कुमार त्याचे वडीलांद्वारे विरुद्ध जेलर, कोनेला जेल आणि अन्य*** [1]आणि ***मनुभाई रतिलाल पटेल विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर*** [2] या प्रकरणामध्ये मध्ये विचारात घेण्यात आला आहे. सदर कायदेशीर प्रशन समाधानपूर्वक सोडवला गेला, अनिर्णित राहीला नाही. सध्याच्या प्रकरणात, हे मान्य आहे की, जेव्हा उत्तरवादीने १८/१९ मार्च २०१८ रोजी हॅबियस कॉर्पसच्या आदेश जारी करण्यासाठी याचिका दाखल केली आणि उच्च न्यायालयाने २१ मार्च २०१८ रोजी त्यावर निर्णय दिला, तेव्हा तिचा पती रिझवान आलम सिद्धीकी, मजिस्ट्रेटने १७ मार्च २०१८ रोजी एफआयआर क्र. आय-३१ संदर्भात दिलेल्या आदेशानुसार पोलिसांच्या ताब्यात होता आणि हा पोलिस रिमांड २३ मार्च २०१८ पर्यंत लागू होता. या व्यतिरिक्त, मजिस्ट्रेटच्या

---

1 (२०१४) १३ एससीसी ४३६

2 (२०१३) १ एससीसी ३१४

दिलेल्या आदेशाला आव्हान न देता, हॅबियस कॉर्पसच्या संदर्भात मर्यादित दिलास्यासाठी याचिका दाखल करण्यात आली. प्रकरणाच्या त्या दृष्टीने, ते सातत्यपूर्ण अवैध स्थानबद्धतेचे प्रकरण नव्हते, तर फौजदारी प्रकरणाच्या तपासा दररम्यान अंमलात असणाऱ्या पोलिस रिमांड, जो क्षेत्राधिकार असलेल्या मजिस्ट्रेटद्वारा निर्गमित आदेशाने मंजूर केला गेला, त्यानुसार विद्यमान व्यक्ति न्यायालयीन कोठडीत होता . त्यामुळे, हे बेकायदेशीर ताबा कायम ठेवण्याचे प्रकरण नव्हते, तर त्याला न्यायालयीन ताब्यात ठेवण्यात आले होते, जो मजिस्ट्रेटच्या आदेशामुळे प्रभावी होता, जो एक गुन्हा प्रकरणाच्या चौकशीदरम्यान पोलिस रिमांड देत होता. परिणामी, हॅबियस कॉर्पसचा कोणताही आदेश दिला जाऊ शकत नाही.

१०. आक्षेपित निर्णयात केलेल्या तीव्र टिप्पण्या काढून टाकण्यासाठीच्या प्रार्थनेकडे परत येताना, विशेषतः वरील उद्धृत परिच्छेद ४-६ मध्ये, असे सादर करण्यात आले आहे की या टिप्पण्या पूर्णपणे अनावश्यक होत्या, कारण संबंधित पोलिस उपआयुक्त, जो न्यायालयात उपस्थित होता, त्याला २३ मार्च २०१८ पर्यंत पोलिस रिमांडचा न्यायालयीन आदेशा न जुमानता रिझवान आलम सिद्धीकीला मुक्त करण्याची परवानगी देऊ शकत नव्हता. याशिवाय, उच्च न्यायालयाने संबंधित पोलीस अधिकाऱ्याला तथ्यात्मक स्थिती स्पष्ट करण्यासाठी शपथपत्रावर स्पष्टीकरण देण्याची संधी न देता टिप्पण्या केल्या, हे स्पष्ट आहे. हॅबियस कॉर्पसची रिट याचिका १८/१९ मार्च २०१८ रोजी दाखल करण्यात

आली आणि २० मार्च २०१८ रोजी ती चालवण्यात आली, जेव्हा न्यायालयाने अपीलकर्त्यांच्या वकिलांना दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ मार्च २०१८ रोजी अभिलेख सादर करण्यास सांगितले . आक्षेपित आदेश २१ मार्च २०१८ रोजी पारित करण्यात आला, तरीही २३ मार्च २०१८ पर्यंत रिमांडचा न्यायालयीन आदेश लागू होता. आमच्या मते, उच्च न्यायालयाने जर न्यायालयाने तसे निर्देश दिले असते तर उत्तरवादीचा पती मुक्त केला जाऊ शकत होता, या पोलिस उपआयुक्त यांच्या वतीने केलेल्या निवेदनावर नाराजी दर्शवू नये, वर नमूद केल्याप्रमाणे डीसीपी कडे असे निवेदन करण्याशिवाय काहीही पर्याय नव्हता. कारण, तो अंमलात असलेल्या न्यायालयीन आदेशानुसार पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपीला, स्वेच्छेने मुक्त करू शकत नव्हता. उच्च न्यायालयाने तपासी अधिकाऱ्या विरोधात कठोर टिप्पणी करण्याऐवजी त्याला शपथपत्रावर स्पष्टीकरण देण्याची संधी दिली पाहिजे होती.

११. असे निरीक्षण मांडणे पुरेसे आहे की, सध्याच्या प्रकरणातील तथ्यात्मक परिस्थितीत हॅबियस कॉर्पसचा कोणताही आदेश दिला जाऊ शकत नाही, त्यामुळे उच्च न्यायालयाने २३ मार्च २०१८ पर्यंत पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यासाठी मजिस्ट्रेटने दिलेल्या न्यायालयीन आदेशाला कोणतेही आव्हान नसताना अटकेच्या गुणवत्तेवर प्रवेश करणे टाळले पाहिजे होते आणि विशेषतः मजिस्ट्रेटच्या आदेशातील कारणांसाठी. अशा काहीशा समान परिस्थितीत, या न्यायालयाने ***राज्य द्वारे पोलिस निरीक्षक आणि इतर***

विरुद्ध एन.एम.टी. जॉय इमॅक्युलेट[3] प्रकरणात तपासी अधिकाऱ्या विरुद्ध त्यांनी केलेल्या तपासाबद्दल उच्च न्यायालयाने केलेल्या निंदात्मक व तीव्र टिप्पण्यांना नापसंती दर्शविली आहे. त्याप्रमाणे आम्हाला सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध आक्षेपित निर्णयाच्या परिच्छेद ४ ते ६ मध्ये केलेल्या टिप्पण्या काढून टाकण्यात आम्हाला कोणतीही शंका नाही.

१२) आधी म्हटल्याप्रमाणे, अपील जरी यशस्वी झाले तरी उत्तरवादीचा पती रिझवान आलम सिद्धीकीला आक्षेपित निर्णयानंतर मुक्त करण्यात आले असल्याने, तपासी अधिकारी केवळ आक्षेपित आदेश रद्द करण्यात आला असल्यामुळे नाही तर त्याच्यावर एफआयआर क्र. आय-३१/२०१८ अंतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्याबाबत काटेकोरपणे कायद्यानुसार कारवाई करु शकतो. आम्ही उत्तरवादीच्या पतीच्या दोषीपणाबद्दल किंवा त्याच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांच्या अचूकतेबाबत कोणतीही मते व्यक्त केली आहेत असे समजले जाऊ नये.

1) त्याप्रमाणे, हे अपील वरील अटींमध्ये मान्य करण्यात येते.

अपील मान्य करण्यात येते.

-x-x-x-x-x-x-

3 (२००४) ५ एससीसी ७२९

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-x-x-x-x-x-x-